# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 17 August 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १७ ऑगस्ट २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- महिला विकासाच्या योजना राबवण्यासाठी हात आखडता घेतला जाणार नाही– मुख्यमंत्र्यांची ग्वाही–मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत राज्यभरातल्या महिलांकडून आनंद व्यक्त
- कोलकाता इथं महिला डॉक्टरवर लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणी राज्यभर निदर्शनं
- देशविघातक नॅरेटिव्ह एकत्रितपणे हाणून पाडणं आवश्यक–देवर्षी नारद पत्रकारिता पुरस्कार सोहळ्यात ज्येष्ठ पत्रकार अजित गोगटे यांची भावना

आणि

- मराठवाड्यात नांदेडसह चार जिल्ह्यात अवैध धंद्यांवर कारवाई– सव्वा दोन कोटी रुपयांहून अधिकचा मुद्देमाल जप्त

****

महिला विकासाच्या योजना राबवण्यासाठी हात आखडता घेतला जाणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. ते आज पुण्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या राज्यस्तरीय लाभ प्रदान कार्यक्रमात बोलत होते. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महिला आणि बालकल्याणमंत्री आदिती तटकरे, यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत पदक विजेता स्वप्नील कुसाळे याचा यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महिलांच्या जीवनात सुखाचे, आनंदाचे दिवस यावे हीच भाऊ म्हणून आपली प्रामाणिक इच्छा आहे आणि

म्हणूनच या योजनेद्वारे बहिणींना दर महिन्याला दीड हजार रुपये माहेरचा आहेर मिळणार असल्याची भावना मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. ते म्हणाले –

> ***परवा रक्षाबंधन आहे. आणि म्हणून बहिण भावाचा हा जो काही सण आहे, हा साजरा करणारा सण जगात कुठल्याही संस्कृतीत नाही. फक्त तो आपल्या हिंदू संस्कृतीत आहे. आम्ही सगळे भाग्यवान आहोत. या लाडक्या बहिणींच्या रूपाने मला लाखो तुमच्या सारख्या बहिणी मिळाल्या. याचा मला आनंद आहे. आणि म्हणून तुम्हा बहिणींची जी काही माया, आशीर्वाद जे आहेत, हे प्रेरणा देणारे आहेत. आणि खऱ्या अर्थाने ऊर्जा देणारे आहेत.***

या योजनेत खोडा घालण्याचे प्रयत्न अनेकांनी केले, मात्र न्यायालयाने आमच्यावर विश्वास दाखवत बहिणींच्या बाजूने निकाल दिल्याचं सांगत, अशा अपप्रचाराबाबत जागरूक राहण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं. महिला लखपती झालेल्या बघण्याची, त्यांना आत्मसन्मान मिळवून देण्याची आपल्या शासनाची इच्छा असून बहिणींच्या हितासाठी शासन आवश्यक ते सर्व प्रयत्न करेल, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

म्हाळुंगे बालेवाडी इथल्या श्री शिवछत्रपती क्रीडानगरीचा परिसर भगिनींनी फुलून गेला होता. विविध गावांहून आलेल्या महिलांनी या योजनेबद्दल आनंद व्यक्त केला.

****

राज्यात अनेक जिल्ह्यातल्या महिला दूरदृश्य संवाद यंत्रणेच्या माध्यमातून या कार्यक्रमात सहभागी झाल्या. छत्रपती संभाजीनगर इथं वंदेमातरम सभागृहात या सोहळ्याचं थेट प्रसारण करण्यात आलं. त्यामाध्यमातून जिल्ह्यातील अनेक महिला या सोहळ्याच्या प्रत्यक्ष साक्षीदार झाल्या. राज्यशासन हे दिलेला शब्द पाळणारे शासन आहे, तुमच्या हक्काचे पैसे तुम्हाला नक्की मिळणार, अशी ग्वाही अल्पसंख्याक विकास, औकाफ आणि पणन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी उपस्थित बहिणींशी संवाद साधताना दिली.

जालना इथं जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल भवनात पालकमंत्री अतुल सावे यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचं प्रसारण झालं. यावेळी लाभार्थी महिला तसंच उत्कृष्ट काम करणाऱ्या पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका यांचा सत्कार करण्यात

आला. जिल्हा प्रशासन तसंच जिल्हा परिषदेसह सर्व संबंधित विभागांनी प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यामुळे अगदी कमी कालावधीत आपला जिल्हा ही योजना प्रभावीपणे राबवू शकला, असं सावे यांनी नमूद केलं.

नांदेड जिल्ह्यात भोकर बाजार समितीच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमात राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांच्यासह या योजनेच्या लाभार्थी महिला मोठ्या संख्येनं उपस्थित होत्या.

हिंगोली इथं जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांच्या उपस्थितीत तर लातूर इथं जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. लाभार्थी महिलांनी मुख्यमंत्र्यांसह सरकारचे आभार मानले. या योजनेमुळे आम्हाला मुख्यमंत्री भाऊ म्हणून लाभल्याची भावना यावेळी लाभार्थी महिलांनी व्यक्त केली. क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे दूरदृश्य प्रणालीद्वारे या कार्यक्रमात सहभागी झाले.
परभणी जिल्ह्यात या योजनेसाठी दोन लाख ५७ हजार दोनशे शहात्तर अर्ज प्राप्त झाले आहेत, त्यापैकी दोन लाख ४७ हजार तीनशे बत्तीस अर्ज पात्र ठरले असल्याचं परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी सांगितलं आहे.

****

कोलकाता इथल्या वैद्यकीय महाविद्यालयात महिला डॉक्टरवर लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणी देशभरात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. भारतीय वैद्यकीय संघटनेनं आज एक दिवसाचा देशव्यापी संप पुकारला आहे. राज्याच्या विविध भागात डॉक्टर संघटनेनं संपाला प्रतिसाद दिला असून सामान्य रुग्णालयात रुग्णसेवा आज बंद आहेत. मुंबईत जे.जे. रुग्णालयासह अन्य रुग्णालयांचे डॉक्टर आणि वैद्यकीय संघटना या संपात सहभागी झाल्या आहेत.
छत्रपती संभाजीनगर इथंही क्रांतिचौकात निदर्शनं करण्यात आली. शहरातील काही खासगी वैद्यकीय रुग्णालयं, वैद्यकीय व्यावसायिक आणि प्रशिक्षणार्थी डॉक्टरांची मार्ड संघटना या संपात सहभागी झाली आहे.

हिंगोलीत डॉक्टर हेडगेवार स्मृती रुग्ण सेवा मंडळ आणि दंत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तर धुळ्यात श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवासी डॉक्टरांनी ठिय्या आंदोलन केलं आहे. नांदेड जिल्ह्यात निमा, मार्ड आदी संघटनांच्या वतीने आज निषेध मोर्चा काढण्यात आला. नागपूर, भंडारा, बुलडाणा, यवतमाळ आदी जिल्ह्यातही डॉक्टरांच्या संघटनांनी या घटनेच्या निषेधार्थ आंदोलनं केली.

****

सध्या पसरवलं जात असलेलं देशविघातक नॅरेटिव्ह सगळ्यांनी एकत्र मिळून हाणून पाडण्याची आवश्यकता ज्येष्ठ पत्रकार अजित गोगटे यांनी व्यक्त केली आहे. मुंबईच्या विश्व संवाद केंद्राचे 'देवर्षी नारद पत्रकारिता पुरस्कार' आज समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले. या पुरस्काराला उत्तर देतांना गोगटे बोलत होते. गोगटे यांच्यासह धीरज वाटेकर, प्रज्ञा पोवळे, अक्षय मांडवकर, सचिन गायकवाड, गौरव ठाकूर, ओंकार दाभाडकर, वनश्री राड्ये, या आठ जणांना या वर्षाचे 'देवर्षी नारद पत्रकारिता पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. केंद्राचे अध्यक्ष सुधीर जोगळेकर यांनी यावेळी केलेल्या भाषणात, या पुरस्काराकरिता अर्ज मागवले जात नाहीत, हे या पुरस्काराचे वैशिष्ट्य असल्याचं नमूद केलं.

****

महाराष्ट्र पशू विज्ञान आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठ तसंच अकोल्यातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यांनी 'काऊ फार्म्स' निर्माण करावेत, असं आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. आज नागपूर इथं दुग्ध व्यवसायावरील राष्ट्रीय परिषदेला ते संबोधित करत होते. या परिषदेत दूध उत्पादक संघ तसंच संस्थांना विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले.

****

नांदेड पोलीस परिक्षेत्रातील नांदेड, परभणी, हिंगोली आणि लातूर या चार जिल्ह्यात पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी अवैध धंदे बंद करण्याचे आदेश दिले होते. त्यासाठी १५ ऑगस्टपर्यंत मुदत देण्यात आली होती. या चारही जिल्ह्यांमध्ये १ ते १५ ऑगस्ट दरम्यान करण्यात आलेल्या कारवाईत १ हजार १६३ गुन्हे दाखल करण्यात आले असून तब्बल २ कोटी २८ लाख ५९ हजार ५५६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कालावधीत हातभट्टीचालक, दारू विक्रेते, गुटखा

विक्रेते, जुगार चालक, अवैध वाळू माफिया यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.
या कारवाईत नांदेड जिल्ह्यात २७ लाख ६६ हजार १९७ रुपयांचा मुद्देमाल, परभणी जिल्ह्यात २३ लाख ७६ हजार ६५४ रुपये, हिंगोली जिल्ह्यात ८ लाख ९८ हजार ७० रुपये आणि लातूर जिल्ह्यात १ कोटी ६८ लाख १५ हजार ३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर नांदेड जिल्ह्यात ३५६ गुन्हे, परभणी जिल्ह्यात २१८ गुन्हे, हिंगोली जिल्ह्यात २१३ गुन्हे आणि लातूर जिल्ह्यात ३७६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

****

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची घटक संस्था असलेली बालरंगभूमी परिषदेचा, जल्लोष लोककलेचा हा महोत्सव आज बीड इथं पार पडला. सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या परिसरात झालेल्या या महोत्सवात शेकडो कलाकारांनी विविध कला प्रकार सादर केले असल्याची माहिती बालरंगभूमी परिषदेच्या मुंबई उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर यांनी दिली.

****

नांदेड जिल्ह्यातील भोकर इथं श्री संत सेवालाल महाराज यांच्या स्मारकाचं आज भूमिपूजन करण्यात आले. राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, यांच्यासह बंजारा समाज बांधव यावेळी मोठ्या संख्येनं उपस्थित होते. सात कोटी रूपये खर्च करून हे स्मारक उभारले जाणार आहे.

****